पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

दिनांक - **१५/०२/२०१९** वेळ - सकाळी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **१५/०२/२०१९** रोजी सकाळी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**सभापती -** सभा कामकाज सुरु करतेवेळी आवश्यक गणसंख्या सभागृहात उपलब्ध नसल्याने ही सभा शुक्रवार दिनांक-०१/०३/२०१९ रोजी सकाळी ११.१५ वा.पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.विधी समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - २०

**सभावृत्तांत**

(दिनांक १५/०२/२०१९ ची तहकूब सभा)

दिनांक - ०१**/०३/२०१९** वेळ - सकाळी **११.१५** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची दिनांक १५/०२/२०१९ ची तहकूब सभा **शुक्रवार** दिनांक ०१**/०३/२०१९** रोजी सकाळी **११.१५** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई - **सभापती**
२. मा.पवार मनिषा प्रमोद
३. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
४. मा.सागर बाळासाहेब गवळी
५. मा.संगिता(नानी)प्रभाकर ताम्हाणे
६. मा.कदम निकिता अर्जुन
७. अड.सचिन सुरेश भोसले

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

दिनांक ०१/०२/२०१९ रोजी झालेल्या विशेष सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक १९**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ८४ विषय क्रमांक - ०१
दिनांक - ०१/०२/२०१९ विभाग – प्रशासन
सुचक : मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक : मा.सागर गवळी
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/०७/कावि/५१/२०१९ दि.२९/१/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील गणवेश देय कर्मचा-यांना गणवेश व तदनुषंगिक साहित्य गणवेश विनियमातील तरतुदीनुसार देण्यात येते. विनिमयामध्ये नमूद बाबी व्यतिरिक्त कर्मचा-यांचा व इतर बाबींचा समावेश करावयाचा असल्यास मा.विधी समिती सभमार्फत मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. मुळ नियम हे सन १९९५ साली तयार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये सन २००४ व सन २०११ मध्ये दुरुस्ती करणेत आलेली आहे. आरोग्य कार्यकारी अधिकारी यांचेकडील दिनांक २९/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामध्ये सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी उबदार कपडे स्वेटर मिळणेकामी होत असलेली मागणी पाहता थंडीपासून बचावासाठी

स्वेटर उपलब्ध करुन देणे ही बाब धोरणात्मक आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभागाकडून सफाई कर्मचा-यांना थंडीपासून बचावासाठी स्वेटर उपलब्ध करुन द्यावयाचे झाल्यास स्वेटर देय महिला व पुरुष कर्मचारी किती आहेत ? स्वेटर देणेबाबत कोणती निकषे(किती कालावधी नंतर देणे) ठरविण्यात आलेली आहेत.? तसेच स्वेटर कोणत्या प्रकारचे असावे दर्जा, रंग इ. बाबत सविस्तर माहिती मागविण्यात आली होती. त्याबाबत आरोग्य विभागाने दिनांक ०३/०२/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सफाई कर्मचा-यांना २ वर्षातुन एकदा स्वेटर देणेत यावा. स्वेटरचा दर्जा उत्तम प्रतिचे वूलन असावे तसेच मनपाचे अन्य विभागातील कर्मचा-यांना देण्यात येत असलेल्याच रंगाचे स्वेटर देण्यात यावे असे कळविले आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४६५(१)ब) अन्वये सद्यस्थितीत वापरात असलेल्या गणवेश विनियमामध्ये आरोग्य विभागातील सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी गणवेश देय पुरुष व महिला कर्मचा-यांना ०२ वर्षातुन ०१ वेळेस हिवाळी प्रावरणे १) स्वेटर(संबधित कर्मचा-यांना ठरवून दिलेल्या गणवेशातील रंगाचा) २) मफलर (स्कार्फ) देय राहतील. अशी दुरुस्ती करण्यात यावी. तसेच सदरचे विनियम सन २०११ मध्ये अद्ययावत करण्यात आले होते. सदर विनियमातील गणवेश देय काही पदनाम आता मनपा आस्थापनेवर नाहीत वा इतर पदनामाध्ये विलीन/ बदल करण्यात आली आहेत. सदरची पदनामे खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | पदनाम | शेरा |
|---|---|---|
| १ | कॅटल स्कॉड कुली | सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवर या अभिमानाचे पद नाही. |
| २ | स्थापत्य सहाय्यक | ---//--- |
| ३ | वसुली अधिकारी | ---//--- |
| ४ | भूकरमापक | ---//--- |
| ५ | प्लंबर फिटर | ---//--- |
| ६ | पंप ऑपरेटर | ---//--- |
| ७ | नळ मुकादम | ---//--- |
| ८ | गवंडी | ---//--- |
| ९ | स्टेशन डयुटी ऑफीसर | ---//--- |
| १० | जकात निरिक्षक | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| ११ | जकात निरिक्षक(महिला) | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| १२ | नाका शिपाई | जकात विभाग बंद झाल्याने आवश्यकता नाही. |
| १३ | अग्निशामक अधिकारी | पदनामात बदल उपमुख्य अग्निशामक अधिकारी |
| १४ | तांडेल | पदनामात बदल लिडींग फायरमन |

उपरोक्त तक्त्यात दर्शविण्यात आलेली पदनामे विनियम सन २०११ मधून कमी करणेस तसेच सफाई संवर्गातील कर्मचा-यांना थंडीपासून बचाव करणेकामी गणवेश देय पुरुष व महिला कर्मचा-यांना ०२ वर्षातून ०१ वेळेस हिवाळी प्रावरणे १) स्वेटर(संबधित कर्मचा-यांना ठरवून दिलेल्या गणवेशातील रंगाचा) २) मफलर(स्कार्फ) देय राहतील. अशी विनियमात दुरुस्ती करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**(माधुरी कुलकर्णी ऊर्फ मोनाताई)**
**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३५/२०१९
दिनांक : ०२/०३/२०१९



**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.